# ऑस्ट्रेलियाच्या बाहेरून कार्यरत असणाऱ्या स्थलांतर प्रतिनिधींविषयी महितीः—

## व्हिसा अर्जदारांना सल्ला

**हे लक्षात ठेवणे खूप महत्वाचे आहे, व्हिसासाठी अर्ज देताना तुम्ही स्थलांतर** प्रतिनिधी नेमणे आवष्यक नसते.तुमच्या अर्जाचे भवितव्य काय असेल हे, स्थलांतर प्रतिनिधी आधी ठरवू षकत नाही,त्यावर प्रभाव टाकू षकत नाही वा ती प्रक्रिया लवकरही करू षकत नसतो.

डिपार्टमेंट **ऑफ इमिग्रेशन अँड सिटीझनशिपने** (डीआयएसी) प्रक्रिया केलेले बरेचसे अर्ज हे **स्थलांतर** प्रतिनिधींनी जमा केलेले नसतात.
असं ही, जर तुम्हाला आत्मविष्वास नसेल किंवा तुमचे प्रकरण गुंतागुंतीचे असेल तर तुम्ही एखादा नोंदणीकृत **स्थलांतर** प्रतिनिधी नेमावा.

जे स्थलांतर प्रतिनिधी **ऑस्ट्रेलियात** कार्यरत असतील ते मायग्रेषन एजंटस रजिस्ट्रेषन ॲथॉरिटीच्या ऑफीसात नोंदणीकृत असणे कायद्याने आवष्यक आहे. ( एमएआरए चे ऑफीस)
**ऑस्ट्रेलियातील** काही नोंदणीकृत स्थलांतर प्रतिनिधी अन्य देषातही कार्यरत असतात. तुम्ही एमएआरए ऑफीसच्या वेबसाईट वर www.mara.com.au त्यांचा षोध घेऊ षकता.

## अर्ज सादर करणे

तुम्ही डीआयएसी कडे परस्पर अर्ज सादर करू षकता किंवा तुमच्यावतीने एखादा प्रतिनिधी अर्ज सादर करू षकतो कोणी अर्ज सादर केला हयाचा विचार न करता खाते सादर झालेले अर्ज स्वीकारते.बरेचसे अर्ज तर ऑनलाईन देता येतात.

जर एखाद्या **ऑस्ट्रेलिया** बाहेरच्या,नोंदणी न केलेल्या स्थलांतर प्रतिनिधीने तुमच्या वतीने अर्ज सादर केला तर त्याला एक परिचय कमांक दिला जातो.हा कमांक डीआयएसी च्या प्रषासन सोईसाठी असतो आणि त्यामुळे त्याला कोणतेही प्राधान्य वा जास्त फायदे दिले जात नाहीत.

**व्हिसा विषयीची माहिती,अर्जप्रकिया** डीआयएसी ऑफीसषी संपर्क साधण्यासाठीचा तपषील www.immi.gov.au **वर उपलब्ध.**

## स्थलांतर प्रतिनिधी नेमण्यासाठी

जर तुम्हाला स्थलांतर प्रतिनिधी नेमायचा असेल तर डीआयएसी एखादा एमएआरए नोंदणीकृत प्रतिनिधी नेमायची षिफारस करते व जेथे हे षकयनसेल तेथे तुमच्या देषातील मान्यताप्राप्त प्रतिनिधी नेमायची षिफारस करते

जर एमएआरए नोंदणीकृत प्रतिनिधी काही बेकायदा कृत्य करायला लावतोय असा तुमचा संषय असेल तर तुम्ही स्थानिक डीआयएसी ऑफीसला सांगू षकता. एमएआरए कडे नोंदणीकृत प्रतिनिधीं विरूद्व अन्य तक्रारी असल्यास त्या www.mara.com.au वर देता येतात.

जर तुम्हाला एखादा **ऑस्ट्रेलिया** बाहेरचा नोदणी नसलेला प्रतिनिधी नेमायचा असेल तर,साधारणतः त्यांच्याकडून काय अपेक्षित असते इ. माहिती समजून घेतल्याची खात्री करा. व जर तुम्हाला प्रतिनिधी अकार्यक्षम,अप्रामाणीक वा फसवा निघाला तर तुम्हाला कोणते पर्याय असतात ते जाणून घ्या.

जर नोंदणी नसलेला प्रतिनिधी काही बेकायदा कृत्य करतोय असा तुमचा संषय असेल तर तुम्ही स्थानिक कायद्याची कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्याला आणि डीआयएसी ऑफीसला माहिती द्या.

## लक्षात ठेवा

- तुम्हाला स्थलांतर प्रतिनिधी नेमलाच पाहिजे असे नसते.
- जर तुम्ही स्थलांतर प्रतिनिधी नेमायचा ठरवलात तर तो नोंदणीकृत असावा.
- डीआयएसी ची तर अषी षिफारस असते की **ऑस्ट्रेलियात** नोंदणी केलेला स्थलांतर प्रतिनिधी योजावा.

**www.immi.gov.au वर अधिक माहिती उपलब्ध आहे.**